बुधवार, दि ८ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक १४ वा ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# भारताचा जीडीपी यंदा ६.४ टक्क्यांवर घसरणार? ; सरकारचा अंदाज

**नवी दिल्ली -** भारताची सकल देशांतर्ग उत्पादन वाढ (जीडीपी) २०२५ या आर्थिक वर्षात ६.४ टक्के राहण्याची शक्यता सांख्यिकी मंत्रालयाने मंगळवार (दि ७) रोजी व्यक्त केली आहे. ही शक्यता २०२४ या आर्थिक वर्षातील ८.२ टक्क्यांच्या जीडीपी पेक्षा खूप कमी आहे. तर, भारतीय रिझर्व्ह बँकेने यापूर्वी २०२५ मध्ये देशाचा जीडीपी ६.६ टक्के राहिल असा अंदाज व्यक्त केला होता.

मागील आर्थिक धोरणाच्या बैठकीत, भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२५ या आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी ६.६ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ६.८ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ७.२ टक्के राहिल असे म्हटले होते. दरम्यान २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत वास्तविक जीडीपी ६.९ टक्के आणि दुसऱ्या तिमाहीत ७.३ टक्के राहिल असा अंदाज वर्तवला होता.

यंदाचा जीडीपी नाममात्र ९.७ टक्के वाढेल असा अंदाज आहे, जो २०२४ या आर्थिक वर्षाच्या ९.६ टक्क्यांपेक्षा किंचित जास्त आहे. मध्यम आर्थिक विकास, म हागाई आणि बाह्य घटकांच्या कामगिरीच्या आधारावर नवा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

सांख्यिकी मंत्रालयाने त्यांच्या अधिकृत प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत २०२४-२०२५ या अर्थिक वर्षाचा जीडीपी ६.४ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. असे असले तरी नाममात्र, जीडीपीमध्ये २०२३-२०२४ च्या ९.६ टक्क्यांच्या तुलनेत ९.७ टक्के इतकी वाढ झाली आहे.

सांख्यिकी मंत्रालयाच्या प्रसिद्धी पत्रकानुसार, २०२५ या आर्थिक वर्षात सकल मुल्यवर्धन ६.४ टक्क्यांनी वाढले आहे, जे २०२४ या आर्थिक वर्षात ७.२ टक्के होते.

'सकल राष्ट्रीय उत्पादन' (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) अर्थात जीडीपी हे देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती मोजण्याचे एक मापक आहे. एखाद्या देशाचा जीडीपी म्हणजे त्या देशाने त्या वर्षी देशांतर्गत उत्पादन केलेल्या वस्तू आणि सेवांची एकत्रित किंमत होय. जेव्हा आपल्याला वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक स्थितीची तुलना करायची असते तेव्हा जीडीपीचा वापर केला जातो. तसेच देशांतर्गत गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी उत्पादन किती वाढले, हे मोजण्यासाठीही जीडीपीच्या दराचा वापर होतो. एखाद्या देशाचा जीडीपी हा त्या राष्ट्राच्या राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न किंवा राष्ट्रीय खर्च यावरून ठरवता येतो.

## गुन्हेगारांना शिक्षा होणार - मुख्यमंत्री

**मुंबई -** संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर मुख्यमंत्र्यांबरोबर नेमकी कोणत्या मुद्द्यावर चर्चा झाली याबद्दल संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी माहिती दिली **पान २ वर**

## अंतर्द्वार ...

**फाफट पसारा सारा**
**लपवून ठेवे सूत्रधार**
**फितूर होतात नेमके**
**ज्यांचेवर खरी मदार**
**हात धुवून घेती सारे**
**झाले भलतेचं उदार**
**हात आखडून बसले**
**करो देता मात्र उधार**
**वठवा भुमिका भली**
**रंगव चांगले किरदार**
**मालक मजेत राहती**
**फिरे सदि किरायेदार**
**शिव्या शाप प्रशासना**
**करी यंत्रणेचा उध्दार**
**अपयश माथी थोपत**
**आळवत बसे गांधार**
**फक्तमागा राजीनामे**
**कोण पाही तुळाधार**
**संशयीढग भरुन येई**
**टिका बरसे धुवांधार**
**दोषीजाती फासावर**
**प्रशासन सांगे निर्धार**
**आटोक्यात असेसारे**
**तपासा गती वसंधार**
**लपवले जातेयं कुणा**
**बंद करो का अंतर्द्वार**
**झेंडे पताका सजवून**
**सजवू ठेवा बहिर्द्वार**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## बचत गटाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाला चालना - आमदार बबनराव लोणीकर



**परतूर । प्रतिनिधी -** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला सक्षम ीकरणावर दिलेला भर देशभरातील लाखो बचत गटांना वितरित करण्यात आलेले कर्ज यामुळे खऱ्या अर्थाने स्त्रीशक्तीला सशक्तिकरणाचा मार्ग सापडला असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

ते परतुर येथे उमेद अभियानांतर्गत इंदिरा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या महिला स्वयंसहायता गटांना कर्ज वितरण मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते

यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, राज्य व केंद्र सरकारच्या माध्यम ातून गेल्या सात आठ वर्षापासून महिला स्वयंसहायता बचत गटांना मोठ्या प्रमाणामध्ये चालना देण्यात आलेली असून उमेद अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील म हिला बचत गटांना विविध व्यवसाय उद्योग संदर्भात मार्गदर्शन करून बँकांमार्फत छोटी मोठी कर्ज उपलब्ध करून दिल्या गेल्याने खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील महिलांना प्रगतीचा मार्ग सापडला असून यामुळे ग्रामीण महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी प्राप्त झाली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

आज या ठिकाणी व्यवसाय मार्गदर्शन केले जात असल्यामुळे घर संसार चालवत अनेक महिलांनी उद्योगधंद्यांच्या माध्यमातून आपली छाप निर्माण केली असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे बोलताना माजी मंत्री आम दार बबनराव लोणीकर म्हणाले की, परतूर विधानसभा मतदारसंघातील अनेक स्वयं सहायता बचत गट यांनी मसाले उद्योग पापड उद्योग केळी पासून चिप्स बनवणे, अशा प्रकारचे छोटे-मोठे उद्योग सुरू केल्याचा आपल्याला आनंद असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुढे ते म्हणाले की नियमितपणे आपण महिला बचत गटांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी **पान २ वर**

## कर थकबाकीदारांची मालमत्ता जप्त

### जालना शहर मनपाची मोहिमेतर्गत कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगर पालिकेने मंगळवार (दि ७) रोजी कराची थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांची मालम त्ता जप्त करण्याची मोहिम राबविण्यात येत आहे. यात जवाहर बाग जवळील हॉटेल अमित चे मालक ललीत मकवाना, राजेंद्र आईल मील, भरतीया इंडस्ट्रीज यांच्याकडे कराची थकबाकी होती. या थकबाकीदारांनी शास्तीसह थकबाकीचा भरणा केला आहे. तसेच जुनी एमआयडीसी येथील सतीश पंच यांच्या म ालकीच्या उमंग इंडस्ट्रीज व जयलक्ष्मी इंडस्ट्रीज या मालमत्तेच्या थकबाकीचा भरणा न केल्यामुळे त्यांची जंगम व स्थावर मालम त्ता जप्त व सील करण्यात आली असल्याची माहिती मनपा प्रशासनाने दिली आहे.

ही जप्तीची मोहिम मनपा आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त श्रीमती प्रियंका राजपूत यांनी स्वतः राबविली आहे. यावेळी सहाय्यक आयुक्त श्रीमती अपर्णा जाधव, कर अधिकारी राजेश कुरलिये, कर निरीक्षक बी.सी. राठोड, सुधीर डहाळे, लक्ष्मीकांत नाकाडे, सर्व वसुली लिपिक उपस्थित होते.

## जेईएस महाविद्यालयातर्फे युवा जल्लोष निमित्त मशाल रॅली

**जालना । प्रतिनिधी -** जे ई एस महाविद्यालय जालना तर्फे महाविद्यालयातील युवकांसाठी आयोजीत 'युवा जल्लोष-२०२५' महोत्सवानिमि त्त युवकांमध्ये चैतन्याचे व खेळाडू प्रवृत्तीचे वातावरण निर्मितीसाठी महाविद्यालयातील युवक- युवतीं साठी दि.६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ८.००वाजता जेईएस म हाविद्यालयाच्या क्रीडांगणावरून मशाल रॅली निघाली असून, झाशीची राणी पुतळा, शिवाजी पुतळा,बडी सडक , कॉलेज रोड मार्गे भारत माता की जय, वंदे मातरम्,घोषणा देत, रॅलीचे विसर्जन महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या उपस्थितीत झाले, यावेळी प्राचार्य डॉक्टर अग्निहोत्री यांनी युवकांना म ार्गदर्शन केले.

या रॅलीत जेईएस म हाविद्यालयातील युवक-युवती तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, उपप्राचार्य प्रा.डॉ.महावीर सदावर्ते व प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षिका प्रा. करुणा वासनिक, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड

क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ. हेमंत वर्मा तसेच युवा जल्लोष




सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रमुख प्रा.डॉ. गणेश कुलकर्णी , राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. डॉ. राजेश सरकटे, प्रा. योगेश लहामाटे, प्रा. किशोर तापडिया, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉ.कॅप्टन फुलचंद मोहिते, डॉ. नागनाथ शेवाळे आदी उपस्थित होते.

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि ८ जानेवारी २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# संपादकीय

## पतंगराव नव्हे रॉकेटराव!

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८१ वी जयंती. ८१ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच , भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते. हळूहळू भारती विद्यापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे. भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते. काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा. त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८० व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे, ९९२२५४६२९५**

### जिल्हास्तरीय फेंटबाल अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात

# मुलांच्या गटात जिल्हा परीषद नेर तर मुलींच्या गटात कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय बदनापुर अजिंक्य

**जालना । प्रतिनिधी -** माजी नगराध्यक्ष तथा जेष्ठ समाजसेवक व फेंटबाल असोसिएशन ऑफ इंडीयाचे अध्यक्ष खुशालसिंग राणा ठाकुर यांच्या वाढदिवसानिमीत्त आयोजीत तिसर्या जिल्हास्तरीय फेंटबाल अजिंक्यपद स्पर्धा अभुतपुर्व प्रतिसाद व प्रचंड उत्साहात संपन्न झाल्या.

स्पर्धेचे उदघाटन खुशालसिंग राणा ठाकुर यांच्या हस्ते करण्यात आले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष भास्करराव‌जी अंबेकर, विशेष उपस्थिती मध्ये कॉग्रेसचे महानगर अध्यक्ष शेख महेमुद, गणपती एज्युकेशन कॅम्पस राजुरचे ज्ञानेश्वर पुंगळे, देवगीरी इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष बबन दादा सोरटी, माजी नगरसेवक जयंतराजे भोसले, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर ढोबळे, माजी नगरसेवक बाला परदेसी, समाजसेवक शेख ईब्राहीम, प्रा.डॉ. बप्पासाहेब म्हस्के यांची उपस्थिती होती, तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य जवाहर काबरा, डॉ. पोकळे साहेब, राजेंद्र परदेशी, अभय सेठ सहानी, शामभाऊ जवादे, ओम प्रकाश दायमा, संजय ठाकुर, अमोल ठाकुर युवा सेना जिल्हाध्यक्ष, मोहन इंगळे, सदाशीव वाघ, तुकाराम काकडे मु.अ. जि.प. प्रशाला नेर, प्रा. गायत्री सोरटी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन शेख चाँद पी.जे. यांनी केले.

स्पर्धेस जिल्हाभरातुन प्रचंड प्रतिसाद मिळाला यात सोळा शाळा व दोन स्पोर्टस क्लबचे ३०६ खेळाडु सहभागी झाले होते, यामध्ये प्रामुख्याने अंबड, बदनापुर, घनसावंगी, परतुर तसेच जालना शहर व जालना तालुक्यातील खेळाडुंचा सहभाग होता.

स्पर्धेत सर्वोत्कृष्ठ कामगीरी करत ओव्हर ऑल चॅम्पीयनशीपमध्ये मुली - प्रथम - कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय, बदनापुर २४ गुण, द्वितीय - जालना स्पोर्टस क्लब, जालना ११



गुण, तृतीय - मत्स्योदरी विद्यालय, अंबड ६ गुण, मुले - प्रथम -जिल्हा परीषद प्रशाला नेर ता. जालना २६ गुण, द्वितीय - जालना स्पोर्टस क्लब, जालना १४ गुण, तृतीय - जिल्हा परीषद प्राथमीक शाळा, बोरी ता. अंबड ८ गुण या शाळांनी यश संपादन केले.

स्पर्धेत पंच म्हणुन उमेशचंद्र खंदारकर, तुषार गर्जे, अमोल सातपुते, सुरेश त्रीभुवन, प्रविण जाधव, अमोल काटकर, संतोष वाघ, शेख समीर, सोहेल खान, शेख सरताज, वेदांत सोरटी, आर्यन जाधव यांनी काम पाहीले, तर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजन समीतीचे अध्यक्ष शेख अहेमद, श्रीमती शेख महेजबीन, श्रीमती गिता वड्डापेल्ली, श्रीमती करूणा निरेवाड, सतीष गाभुड, सुभाष पारे, सुरेश सावंत, नितीन जाधव, अमोल सोलाट, विजय सदावर्ते, सतीष घारे, राजेश शेवाळे, शेख ईस्माईल, झाल्टे सर, गोपाल सर, ढगे सर, लांडगे सर, शेख मतीन, शेख अकबर, शेख साबेर आदींनी परीश्रम घेतले.

# सौ मीराताई बालासाहेब बोरडे यांचा नगराध्यक्षपदाचा राजीनामा

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ मीराताई बालासाहेब बोरडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे सादर केला. मागील अडीच वर्षाच्या कार्यकाळात शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोरडे यांच्या नेतृत्वाखाली मंठा शहरात अनेक विकासाची कामे करण्यात आली. सर्वांना विश्वासात घेऊन त्यांनी मंठा शहरात रस्ते, पाणी, दिवाबत्ती, स्वच्छता या मूलभत प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष दिले. शासनाने नगराध्यक्ष पदाचा अडीच वर्षाचा कार्यकाळ रद्द केला होता. मात्र, तरीही त्यांनी आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे नगराध्यक्षपदाचे कामकाज करण्यासाठी पूर्ण वेळ देऊ शकत नाही म्हणून आपला नगराध्यक्ष पदाचा राजीनामा सोमवार ता. सहा रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.



## पान १ वरुन

### गुन्हेगारांना ...

आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी कोणीही असला तरी त्याला सोडणार नसल्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे धनंजय देशमुख यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांची मुंबईत भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात जे सांगितलं होतं, तेच आश्वासन आम्हाला दिलं आहे. आरोपी असणाऱ्या कोणालाही सोडणार नाही, जे आरोपी आहेत त्यांना शिक्षा दिली जाईल. महाराष्ट्राला यातून एक उदाहरण पाहायला मिळणार आहे, इथे गुन्हेगारांना माफ केलं जात नाही आणि तसं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं आहे.

आम्ही त्यांच्याबरोबर या सगळ्या प्रकरणाची चर्चा केली, आज कुठलंही निवेदन दिले नाही. आमच्याकडे काही ऑफिशीयल गोष्टी होत्या त्या मुख्यमंत्र्यांना दाखवल्या. आम्हाला न्याय पाहिजे तो कसा मिळणार याबद्दल आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितलं, असेही धनंजय देशमुख पुढे बोलताना म्हणाले.

निष्पक्षपातीपणे या गुन्ह्यामध्ये तपास झाला पाहिजे अशी भूमिका आपण देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडली आणि मुख्यमंत्र्यांनी ही मागणी मान्य केल्याचेही धनंजय देशमुख म्हणाले. या गुन्ह्यामध्ये कोणीही असले तरी त्याला शिक्षा होणार असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खरा सूत्रधार कोण? हे समोर आले पाहिजे अशी मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर या प्रकरणाच्या तपासासंबंधी बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, आम्ही ज्या एफआयआर आहेत त्याप्रमाणे आम्ही मुख्यमंत्र्यांशी बोललो. त्यानंतर घटना घडली त्या कालावधीमधील सर्वांचे सीडीआर काढा आणि त्याप्रमाणे सर्व तपास करा असेही मुख्यमंत्र्यांना सांगितले.

गेल्या चार-पाच महिन्यातील एफआर आहेत, ते एकमेकांशी कसे जुळतात याबद्दल तसेच आतापर्यंत झालेल्या तपासाचा अहवाल मिळण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली, दोन दिवसात जो तपास झाला आहे त्याचा अहवाल आपल्याला मिळेल असेही धनंजय देशमुख यावेळी म्हणाले.

### बचत गटाच्या ...

आग्रही राहत असून या संदर्भात अनेक बैठका बँकेच्या मॅनेजर सोबत आपण केल्या असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण परतूर मंठा नेर शेवली भागामध्ये कायमचे आयोजन करून एक लाख दहा हजार महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून दिल्यामुळेच या महिला मंडळाच्या सदिच्छामुळेच आज पुन्हा एकदा आमदार म्हणून निवडून आलो असल्याचे सांगितले

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते परतुर तालुक्यातील ३१० बचत गटांना नऊ कोटी रुपयाचे कर्ज वितरित करण्यात आले दहा लक्ष रुपयांचा अपघात विमा ही वितरित करण्यात आला दरम्यान महिला बचत गटांनी विविध प्रकारचे स्टॉल लावून ठिकाणाहून विविध उत्पादित वस्तू विक्री केल्या त्याचबरोबर महिला बचत गटाच्या माध्यमातून उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांचा सत्कार यावेळी आमदार लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आला

यावेळी तहसीलदार डॉ प्रतिभा गोरे, रमेश भापकर, शशिकांत पाटील, श्री सी एन धार्मिक, श्री विजय राम श्री निलेश चौके, श्री धर्मेद्र शर्मा श्री प्रभाकर वटाणे अशोकराव बरकुले तुकाराम सोळंके बंडू मानवतकर नरेश कांबळे यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संदीप दाभाडे यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# आगामी काळात कार्यकर्त्यांच्या होणाऱ्या निवडणुकीसाठी सदस्य नोंदणी महत्त्वाची - माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** राज्यभरात भाजपचे सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत असून लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह गावातील भूत पातळीवर काम करणाऱ्या व्यक्तीसह भारतीय जनता पक्षाचे मतदार यांची सदस्य नोंदणी करून या सर्वांनाच या अभियानाच्या माध्यम ातून भाजपचे सदस्य केले जात आहे. पक्षाकडून डिसेंबरपासून सुरू झालेल्या सदस्य नोंदणी अभियानात प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी सदस्य नोंदणीचे लक्ष्य देण्यात आले असून परतुर विधानसभा मतदारसंघासाठी ७० हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांनंतर लागलीच संघटन पर्वाची सुरुवात झाली असून आगामी काळात कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत त्यासाठी पक्षाचे सदस्य नोंदणी म हत्त्वाचे असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे.

जालना तालुक्यातील नेर व सेवली या ठिकाणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या प्रम ुख मार्गदर्शनाखाली लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी शक्ती केंद्रप्रमुख भूतप्रमुख व प्रमुख कार्यकर्ते यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकी प्रसंगी आम दार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या ऐतिहासिक विजयानंतर पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी हे अभियान राबविले जात असून राज्य, विभाग, जिल्हा, मंडळ अशा सर्व ठिकाणी प्राथमिक सदस्यता नोंदणी प्रक्रियेला सुरु आहे. राष्ट्राला समर्पित भावनेतून काम करणारा आणि जगभरात सर्वांत जास्त प्राथमिक सदस्य असलेला एकमेव भाजप आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

महाराष्ट्रात निवडणुका संपल्यानंतर दुसऱ्या दिवशीपासूनच राज्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना तात्काळ हे नोंदणी अभियान सुरू करण्याचे निर्देश दिले होते आज संपूर्ण महाराष्ट्रासह परतूर विधानसभा मतदार संघात प्राथमिक सदस्यता नोंदणी सुरू आहे. परतुर मतदारसंघांमध्ये हजारो कार्यकर्ते सदस्य नोंदणी अभियानाच्या माध्यमातून काम करत असून या सदस्य नोंदणी अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतअसून या सदस्यता नोंदणी अभियानांतर्गत प्रत्येक मंडलात बैठक व कार्यशाळा घेऊन प्रत्येक बूथ वरती किमान २५० सदस्यांची नोंदणी करावी, याबाबत आवश्यक सूचना दिल्या. लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी बूथ पमुख शक्ती केंद्रप्रमुख यांनी घरोघरी जाऊन जास्तीत जास्त सभासद नोंदणी करून घ्यावी. प्रदेश भारतीय जनता पार्टीच्या वतीने परतून विधानसभा म तदारसंघाला देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी ज्ञानेश्वर शेजुळ, जिजाबाई जाधव, हनुमंतराव उफाड, सरपंच अदील पठाण, दिलीप पवार, दिलीप जोशी, विकास पालवे, गजानन उफाड, विक्रम उफाड, अजीम पटेल, राम राठोड, नरवडे, कृष्णा निंबाळकर, कैलास राठोड, विलास राठोड संतोष निंबाळकर, संदीप राठोड, जयंत किनगावकर, बाबुराव शिंदे, रमेश पवार, सौरभ म ाहोरकर, सतीश सदावर्ते, विठ्ठल रांजनकर, खलील चौधरी, गणेशराव खैरे, प्रकाश ईलग, विठ्ठल मोरे,



विनोद राठोड, समाधान वाघमारे, प्रमोद भालेकर, कृष्णा केंद्रे, नंदू घोडे, कोमल कुचेरीया, कैलास उफाड, श्रावण चव्हाण, रामदास ढाकणे, गणेश जावळे, सुग्रीव चौरे, गणेश मोरे, प्रल्हादराव पिठोरे, परमेश्वर सोळंके, माऊली ढाकणे, रामेश्वर काकडे, सुधाकर खंडागळे, अरुण सदावर्ते, माऊली क्षीरसागर, प्रभाकर गाढवे, गोविंद खरात, दत्तराव गणेश शेजुळ, भास्कर ढाकणे, फरहान अन्सारी, भागवत शेजुळ, नईम पटेल, राजेश राठोड जिया चौधरी, विजय घाडगे सचिन घाडगे जालिंदर राठोड शंकर राठोड विष्णुपत सहाने, गजानन खराबे, राजू पवार, विलासराव उफाड, पांडुरंग उफाड, अहमद कुरेशी, अजू कुरेशी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# नवनियुक्त शालेयशिक्षणमंत्री दादा भुसे यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार!

## शिक्षण सेवक कालावधी रद्द करा - शेख अब्दुल रहीम

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचा मंत्रीमंडळाचा विस्तार झाला आणि राज्याला नवीन शालेय शिक्षण महणून मालेगाव जिल्हा नाशिक विधानसभा म तदारसंघाचे मा.ना. दादा भुसे साहेब यांच्या रुपी राज्याला शिक्षण मंत्री मिळाले. तसेच त्यांनी नुकतेच नाशिक म हानगर पालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थिती पदभार स्वीकारल्यानंतर हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जूनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सरांनी आज दिनांक ३ जानेवारी २५ शुक्रवारी रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथे निवास स्थानी जाऊन भेट घेतली व त्यांचे अभिनंदन केले व विद्यार्थी-शिक्षकांचे अनेक प्रश्न आपल्या हातून लवकरच सुटतील असा पक्का विश्वास व्यक्त केलं तसेच त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा ही दिल्या आणि विविध मागणीचे निवेदन सादर करण्यात आले...

शिक्षण सेवक कालावधी रद्द करण्यात यावे.



शिक्षकांना BLO च्या कार्यातून कार्यमुक्त करण्यात यावे.

शाळा व शिक्षकांचे अनुदान, वेतन व शाळा घोषित करण्याबाबत महायुती शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी कॅबिनेटमध्ये केलेले निर्णय, त्या निर्णयांची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

राज्यातील अनेक शाळांतील विद्यार्थी गणवेश पासून अद्याप ही वंचित आहे त्या सर्व विद्यार्थांना त्वरित गणवेश वाटप करण्यात यावे., अश्या अनेक विषयावर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावेळी मालेगाव भिवंडी चे हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे सदस्य शारीक म ोमीन आदींची उपस्थिती होती.

# राधाकृष्णजी महाराज यांच्या श्रीमद् भागवत कथा मंडपाचे आज भूमिपूजन

**जालना। प्रतिनिधी -** श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यम ाने नवा मोंढा रोडवर दानकुंवर परिसरातील श्री ब्रजधाम येथे १८ ते २४ जानेवारीदरम्यान गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचे मंडप भूमिपूजन बुधवार दि. ८ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता होणार आहे.

श्रीराम मंदिराचे पुजारी पू. पू. मनोज महाराज गौड यांच्या प्रमुख उपस्थितीत यजमान शिवरतन मुंदडा यांच्याहस्ते सपत्नीक मंडप भूमिपूजन व ध्वजारोहण होणार आहे. १८ जानेवारीपासून दुपारी १ ते ५ या वेळेत राधाकृष्णजी महाराज यांच्या वाणीतून श्रीमद् भागवत कथा होणार आहे. मंडप भूमिपूजन व ध्वजारोहण कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज जालनातर्फे करण्यात आले आहे.






# कराटे बेल्ट वितरण सोहळा संपन्न




**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा शाईन कराटे डू तर्फे कराटे बेल्ट परिक्षा घेण्यात आल्या होत्या या परिक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना कराटे बेल्ट प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वितरण सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नारायणा ई टेक्नो स्कुलच्या मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून जेईएस महाविद्यालयाचे प्रो. श्रीमती रेखा भुरेवाल, नारायणाचे अकॅडमीक डीन व्यंकट राजू गुडला यांची उपस्थिती होती.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये ब्राऊन बेल्ट पहिल्या क्रमांकावर आश्विनी आजगे, आरुषी वल्लकट्टी, पुर्वा माने, लावण्या गुडला, दिव्यता कोठारी यांना गौरविण्यात आले. ब्ल्यू बेल्ट २nd शेलमान गुडेकर, सम्यक शहा,

ब्ल्यू बेल्ट १st तनिष्का भागडे, मयुरेश भाले, यक्ष दुरोळे, ग्रीन बेल्ट २nd : दिशा जगधने, निवांशी वलकट्टी, ऋषिकेश श्रीपाम, ग्रीन बेल्ट १st : अनुष्का म्हेत्रे, प्राजक्ता राऊत, वैष्णवी लोखंडे, मीनल सती वाले, संस्कार त्रिंबके, देवेंद्र चिंचपुरे, प्रशिक राऊत, ऑरेंज बेल्ट - आराध्या खत्ती, समीक्षा करें, देवेश करें, नौशाद शेख, येलो बेल्ट - सीमा ढाके, आकांक्षा चिल्का, खुशी म्हात्रे, यशवर्धन चिल्का, मोहन झुंजूर या विद्यार्थ्यांना कराटे बेल्ट व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रसंगी सेन्साई रुपेंद्र गोपाल पारचा यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार आश्विनी आजगे यांनी मानले. यशस्वी विद्यार्थ्यांना श्री महावीर स्थानकवासी जैन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, मुख्याध्यापक श्री वानगोता, माजी उपनगराध्यक्ष राजेश राऊत, माजी नगरसेकव महावीर ढक्का, रितेश अग्रवाल, श्री यादव, संजय भगत, प्रशांत पेम्बार्ती, रितेश जैस्वाल यांच्यासह पालकवर्गांनी कौतूक करुन शुभेच्छा दिल्या.

## स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्याची मागणी

### मोर्चात सहभागी होणार सर्व जातीधर्माचे लोक



**जालना । प्रतिनिधी -** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झालेली आहे. या गुन्ह्यातील सर्व आरोपींना अटक करण्यासह सर्वांना फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी जालना शहरात १० जानेवारी रोजी महाआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा कोणत्याही जातीविरोधात नसून गुंडशाही प्रवृत्ती विरोधात हा लढा असून,या मोर्चात सर्व जातीधर्मिंचे लोक सहभागी होणार असल्याची माहिती मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयकांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

जालना शहरातील भाग्यनगर येथील मराठा सेवा संघाच्या कार्यालयात या महाआक्रोश मोर्चाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी समन्वयक सुनिल आर्दड म्हणाले की, महाआक्रोश मोर्चा काढण्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्याशी मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांची बैठक झाली. या बैठकीत जागा पाहणीसह इतर महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा झाली आहे. सरपंच संतोष देशमुख यांची झालेली हत्या ही अत्यंत क्रुर आणि अमानवीय असून, यातील आरोपींना कडक शासन व्हावे, यासाठी हा महाआक्रोश मोर्चा काढण्यात येत आहे. यात केवळ मराठा समाजच नव्हे तर इतर सर्व समाज आणि धर्माचे बांधवही सहभागी होणार आहेत. गुंडशाही आणि झुंडशाहीविरोधात आवाज उठविण्याची गरज असून, हा प्रकार थांबला नाही तर भविष्यात काय घडेल, याची केवळ कल्पनाच केलेली बरी. त्यामुळेच संतोष देशमुख यांना न्याय देण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेत मातंग शक्ती संघटना, लहुजी संघट, छत्रपती फाऊंडेशन, बौद्ध सामाजिक संघटनेसह मुस्लिम समाजाच्या नेत्यांनीही या मोर्चाला आपला व समाजाचा पाठिंबा दर्शवला. यावेळी राजेश राऊत, इकबाल पाशा, सुनील साळवे, विक्की साळवे, सुदामराव मुकणे, अरविंद देशमुख, अशोक पडुळ, शुभम टेकाळे, विष्णू पाचफुले, जगन्नाथ काकडे, देवकर्ण वाघ, संजय देठे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

मोर्चेकऱ्यांच्या मागण्यांमध्ये स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करुन त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी., या प्रकरणात अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याला सहआरोपी करुन खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा., वाल्मिक कराड यांच्यावर वरदहस्त असणाऱ्या राजकीय मंडळीची एसआयटी चौकशी करावी., केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन बडतर्फ करुन सहआरोपी करुन गुन्हा दाखल करण्यात यावा., स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरण जलद न्यायालयात चालविण्यात यावे., स्व. संतोष देशमुख यांच्या कुंबियांना शासनाकडून एक कोटी रुपयांची मदत देण्यात यावी., त्यांच्या मुलीस शासकीय सेवेत सामावून घ्यावे., या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत त्यांच्या गावास व कुटुंबास पोलिस संरक्षण देण्यात यावे., एसआयटी चौकशीसाठी नेमलेले अधिकारी हे बाहेरील विभागातील अथवा बाहेर जिल्ह्यातील मराठवाडा विभाग सोडून नेमावे. या मागण्यांचा समावेश आहे.

